सकाळ



# स्पर्धा परीक्षा आणि पर्याय

'लक्ष्य'भेद

सोनल सोनकवडे



नागरी सेवेसाठीच्या अवघड परीक्षा पास होण्याच्या सततच्या दडपणातून एक दिलासा म्हणून काही मुलं अर्थार्जनासाठी काही मार्ग निवडतात आणि छोट्या-मोठ्या नोकऱ्या करू लागतात. आर्थिक स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता आल्यास त्याचा फायदा असा होतो, की आपली मनःस्थिती सुधारते. किमान आर्थिक स्थैर्यामुळे आपल्या मनावरील दडपण बहुतांश प्रमाणात कमी होतं आणि आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांचा दृष्टिकोनही बदलतो. आर्थिक स्वावलंबनाचा अनेक वेळा आपल्या भावनिक आरोग्यावर आणि परिणामी 'आयक्यू'वर सकारात्मक परिणाम होतो.

'यूपीएससी'ची परीक्षा पास झाल्यानंतर त्यामुळं मिळणारं पद, प्रतिष्ठा, मानमरातब आणि राष्ट्रीय पातळीवरील संधी या याबद्दल माझ्या वडिलांना विशेष अप्रूप आणि आदर होता. लहानपणापासून तो सतत दिसत असल्यानं मीही कधी 'एमपीएससी'ची परीक्षा देण्याबद्दल ठोस असा काही विचार केलाच नव्हता. वडिलांच्या मनातही राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्याबाबत अनुकूल मत नव्हतं. मात्र, दोन प्रयत्न झाल्यानंतर मी या सगळ्याबाबत विचार केला आणि आई-वडिलांना न सांगताच 'एमपीएससी'ची परीक्षा दिली. याचं एक कारण, दुसऱ्या प्रयत्नातही मला अपयश आलं तेव्हा मी आता अधिकारी झाले नाही तर मी दुसरं काही होऊ शकणार नाही असा विचार मला सतावू लागला आणि स्वतःला अजून एक संधी देण्यासाठी मी 'एमपीएससी'ची परीक्षा दिली आणि माझ्या प्रवर्गात राज्यात पहिली आले.

'यूपीएससी'ही तुमच्या सामान्य ज्ञानाची परीक्षा असतेच, परंतु त्याचबरोबर तुमच्या सातत्य, चिकाटी आणि मानसिक आरोग्याचीही परीक्षा असते. यात नशीब हाही एक महत्त्वाचा घटक असतो. जी मुलं अतिबुद्धिमान असतात त्यांना सगळं आदर्श हवं असतं. त्यांना अपयशाची किंवा अगदी कमी गुण मिळवण्याचीही सवय नसते, त्यामुळं या परीक्षेत आलेलं अपयश ती मुलं पचवू शकत नाहीत. काही मुलं अधिकारी झाल्यावर एकदम बदलून जातात. त्यांच्या वागण्या-बोलण्यात फरक पडतो. ते आदर्श वागू लागतात. महाराष्ट्रात मात्र अधिकारी झाल्यावर आपला प्रवास या परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या मुलांपर्यंत पोचवणारे अधिकारी कमी आहेत. 'यूपीएससी' ही तुमच्या भावनिक स्थैर्याचीही परीक्षा आहे. त्यामुळं तुमचा भावनिक बुद्ध्यांक चांगला ठेवायचा असल्यास ही परीक्षा म्हणजे आयुष्यातील सर्वस्व नसून चांगल्या पद्धतीने जीवन जगण्याच्या अनेक मार्गांपैकी तो एक मार्ग आहे, हे तुमच्या लक्षात आलं पाहिजे. देशसेवा करण्याचे अनेक मार्ग आहेत. प्रत्येक कामात किंवा व्यवसायात तुम्ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या देशसेवा करतच असता. मात्र, प्रशासकीय सेवेत असताना सामाजिक प्रतिष्ठा, पैसा, सत्ता, नोकरीच्या ठिकाणी असलेली सुरक्षा आणि पद पाच गोष्टी मिळतात. इतर ठिकाणी मात्र यातील चारच गोष्टी तुम्हाला मिळतात.